ePaper

**नेपाळ महापूर: मृतांची संख्या 626 वर! 320 भारतीय अजूनही बेपत्ता**




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज (TM)

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 30 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




## कीव्हमध्ये २७ ठार; ५० निवासी इमारतींचे नुकसान

# रशियाचा युक्रेनवर ड्रोन हल्ला

**महाईन्यूज । कीव्ह**

**रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाने युक्रेनच्या कीव्ह परिसरावर केलेल्या ड्रोन हल्ल्यात किमान २७ जणांचा मृत्यू झाला आहे. कीव्हच्या पश्चिम उपनगराजवळील मायला शहरातील एका कंपनीच्या आवारातील गोदामाला ड्रोन धडकल्यानंतर भीषण आग लागली. त्यानंतर परिसरात अनेक स्फोट झाले. या घटनेत सुमारे ५० निवासी इमारतींचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.**

### एकमेकांवर लांब पल्ल्याच्या हल्ल्यांमध्ये केली मोठी वाढ

गेल्या काही महिन्यांपासून रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांनी एकमेकांवर लांब पल्ल्याच्या हल्ल्यांमध्ये मोठी वाढ केली आहे. यामुळे आगीच्या घटना वाढल्या आहेत. 'एएफपी'ने दिलेल्या वृत्तानुसार, राजधानी कीव्हच्या पश्चिम उपनगरांवरून आकाशात काळ्या धुराचे लोट पसरले. गोदामाला लागलेली आग अद्यापही धुमसत आहे.

युक्रेनच्या सरकारी वकील कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, "२८ ऑगस्ट रोजी रात्री ८:१० च्या सुमारास कीव्हच्या पश्चिम वेशीवर वसलेल्या मायला शहरातील एका कंपनीच्या आवारात एक मानवरहित हवाई वाहन (ड्रोन) कोसळले किंवा धडकले. त्यानंतर कंपनीच्या आवारात भीषण आग लागली आणि स्फोट होऊ लागले."







युक्रेनच्या सरकारी वकिलांच्या माहितीनुसार, २८ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ८.१० वाजता मायला शहरातील एका कंपनीच्या आवारात मानवरहित हवाई वाहन कोसळले किंवा धडकले. त्यानंतर कंपनीच्या परिसरात मोठी आग लागली आणि स्फोट होऊ लागले. गोदामात 'स्फोटक वस्तू' साठवण्यात आल्याचा संशय असून, या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी सुरू करण्यात आली आहे.

कीव्ह प्रदेशाचे गव्हर्नर तिमूर तकाचेन्को यांनी हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली. जखमींची संख्या मोठी असल्याने मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. मृतांमध्ये दिमित्रिवस्काचे महापौर तारास डिडिच यांचाही समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

हल्ल्यानंतर कीव्हच्या पश्चिम उपनगरांच्या आकाशात काळ्या धुराचे लोट दिसून आले. गोदामाला लागलेली आग आटोक्यात आणण्यासाठी बचाव पथकांकडून प्रयत्न सुरू होते. परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांनी एकमेकांवर लांब पल्ल्याच्या हल्ल्यांमध्ये मोठी वाढ केली आहे. ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या हल्ल्यांमुळे दोन्ही देशांमध्ये आगीच्या घटना आणि मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. युक्रेनचे पंतप्रधान सर्गी कोरेत्स्की यांनी या घटनेवर तीव्र खेद व्यक्त केला. यापूर्वी जुलैमध्ये कीव्हजवळील विश्नेवे येथील दारूगोळा आगाराला लागलेल्या आगीच्या घटनेनंतरही सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी समोर आल्या होत्या. निवासी भागाजवळ असलेल्या सरकारी कंपनीने सुरक्षा मानकांचे पालन केले नसल्याचे चौकशीत आढळले होते.

"संघर्ष पाचव्या वर्षात पोहोचला असतानाही त्याच चुका पुन्हा पुन्हा करणे हा गंभीर निष्काळजीपणा आहे," अशी प्रतिक्रिया कोरेत्स्की यांनी व्यक्त केली. रशिया-युक्रेन संघर्ष अधिक तीव्र होत असताना नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# दुर्गम ‘मंकी हिल’ला मिळणार रस्त्याची जोड

## एक्स्प्रेस-वेकडून १.५ किमी काँक्रिट रस्ता; पावसाळ्यात बचावकार्याला मिळणार वेग

**महाईन्यूज । पुणे**

**खंडाळा घाटातील दुर्गम मंकी हिल रेल्वे स्थानकाला अखेर रस्त्याने जोडण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गापासून मंकी हिलपर्यंत सुमारे १.५ किलोमीटर लांबीचा काँक्रिट रस्ता बांधण्यात येणार आहे. या रस्त्यामुळे पावसाळ्यात दरडी कोसळणे किंवा रेल्वे मार्गाचे नुकसान झाल्यास मदत व बचाव पथकांना घटनास्थळी पोहोचणे अधिक सुलभ होणार आहे.**



मंकी हिल ते कर्जत-पळसधरी आणि खंडाळा परिसरातील सुमारे १९ ते २० किलोमीटरचा भोर घाट रेल्वेमार्ग घनदाट जंगल आणि खोल दऱ्यांमधून जातो. या मार्गावरील ठाकूरवाडी, नागनाथ, जांभूंग आणि मंकी हिल ही ठिकाणे सध्या रस्त्याने जोडलेली नाहीत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रेल्वेच्या मार्गावरूनच कर्मचारी, यंत्रसामग्री आणि बचाव पथकांना घटनास्थळी न्यावे लागते.

पावसाळ्यात घाट परिसरात दरडी कोसळण्याच्या घटना वारंवार घडतात. त्यामुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम होण्याबरोबरच घटनास्थळी तातडीने मदत पोहोचविण्याचे आव्हान निर्माण होते. अशा परिस्थितीत प्रस्तावित रस्ता महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

हा रस्ता द्रुतगती मार्गाच्या खंडाळ्याकडे जाणाऱ्या मार्गिकेपासून मंकी हिल स्थानकापर्यंत करण्यात येणार आहे. रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने, बचाव पथके तसेच अवजड यंत्रसामग्री या मार्गाचा वापर करू शकतील. या कामासाठी अंदाजे १.५ ते २ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मात्र, मंकी हिल परिसर वन विभागाच्या अखत्यारीत असल्याने रस्ते बांधकामासाठी आवश्यक परवानग्यांची प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे. त्यासाठी मध्य रेल्वेने वन विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

दरम्यान, मंकी हिलसोबतच ठाकूरवाडी, नागनाथ आणि जांभूंग या दुर्गम ठिकाणांनाही भविष्यात रस्त्याने जोडता येईल का, याची व्यवहार्यता तपासण्याचे काम रेल्वेकडून सुरू आहे. त्यामुळे हा प्रकल्प केवळ मंकी हिलपुरता मर्यादित न राहता संपूर्ण घाट रेल्वेमार्गाच्या आपत्कालीन व्यवस्थेला बळकटी देणारा ठरू शकतो.

### १.५ किलोमीटरचा काँक्रिट रस्ता

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गापासून मंकी हिल रेल्वे स्थानकापर्यंत सुमारे १.५ किलोमीटरचा काँक्रिट रस्ता उभारण्यात येणार आहे. या कामासाठी १.५ ते २ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

# पुण्यातील ‘मिसिंग लिंक’ची रखडलेली कामे मार्गी लागणार



**महाईन्यूज । पुणे**

**शहरातील वाहतूककोंडी कमी करून विविध भागांतील रस्ते जोडणी अधिक सक्षम करण्यासाठी रखडलेल्या ‘मिसिंग लिंक’च्या कामांना आता गती मिळणार आहे. या कामांमध्ये प्रलंबित असलेले भूसंपादन आणि अन्य प्रशासकीय अडथळे तातडीने दूर करण्याच्या सूचना महापालिका आयुक्त नवल किशोर राम आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.**

शहरातील वाहतूक व्यवस्था आणि रस्ते जोडणीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विविध रस्त्यांचा महापालिकेने ऑगस्ट २०२२ मध्ये एमआयटी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मदतीने अभ्यास केला होता. महापालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांचा विकास आराखडा (डीपी) तसेच प्रादेशिक विकास आराखडा (आरपी) विचारात घेऊन प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली होती.

या पाहणीत भूसंपादन तसेच अन्य कारणांमुळे अनेक रस्त्यांची कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. काही ठिकाणी दोन ते तीन किलोमीटर, तर काही ठिकाणी अवघे १०० ते २०० मीटर अंतर जोडणीअभावी रस्त्यांचे काम रखडले आहे. त्यामुळे काही मीटरच्या अंतरासाठी वाहनचालकांना मोठा वळसा घ्यावा लागतो. परिणामी उपलब्ध रस्त्यांचा पूर्ण क्षमतेने वापर होत नसून वाहतूककोंडीतही भर पडत आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी शहरातील ‘मिसिंग लिंक’च्या कामांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर, ओमप्रकाश दिवटे, शहर मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील विविध ‘मिसिंग लिंक’ची सद्यस्थिती, आवश्यक भूसंपादन, उपलब्ध जागा, संबंधित मालमत्ता, रस्ते जोडणीसाठी आवश्यक कार्यवाही आणि प्रलंबित विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कोणत्या ठिकाणी कोणत्या कारणामुळे काम रखडले आहे, याची माहिती घेऊन संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

शहरातील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी आणि विविध भागांना थेट रस्ते जोडणी उपलब्ध करून देण्यासाठी ‘मिसिंग लिंक’ची कामे महत्त्वाची आहेत. त्यामुळे भूसंपादनाची प्रक्रिया, प्रशासकीय मंजुरी आणि इतर प्रलंबित बाबींचा तातडीने निपटारा करून कामांना गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डुडी यांनी दिले. या कामांमुळे शहरातील अनेक भागांमधील प्रवासाचे अंतर आणि वेळ कमी होण्यास मदत होण्याची अपेक्षा असून, रखडलेल्या रस्त्यांचा नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### ‘मिसिंग लिंक’ का महत्त्वाची?

रस्त्याचा काही मीटरचा भाग रखडल्याने पूर्ण झालेला रस्ता नागरिकांच्या वापरात येत नाही. परिणामी वाहनचालकांना छोट्या अंतरासाठीही मोठा वळसा घ्यावा लागतो आणि वाहतूककोंडी वाढते.

### जोडणीला मिळणार गती

मिसिंग लिंकची कामे पूर्ण झाल्यास शहरातील विविध भागांची रस्ते जोडणी अधिक सक्षम होऊन वाहतूककोंडी कमी होण्यास आणि प्रवासाचा वेळ वाचण्यास मदत होणार आहे.

# मावळच्या भातशेतीचा जपानकडून अभ्यास

## भातशेतीतील पाणी व्यवस्थापनावर शहा फार्म्समध्ये ज्ञानाची देवाणघेवाण

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**जपानमधील पोस्टडॉक्टोरल संशोधक मिचिहिरो ओगावा ,शिनोबू इगुरो ,सेइका वाझाकी , वाकाको मियाझावा, सातोमी हिगाशी या शिष्टमंडळाने नुकतेच भात लागवडीतील जलव्यवस्थापनाच्या पद्धतींचा अभ्यास करण्यासाठी मावळ परिसरातील चांदखेड येथील शहा फार्म्सला भेट दिली. या भेटीदरम्यान शिष्टमंडळाला स्थानिक सिंचन पद्धती, पाण्याची उपलब्धता आणि भात लागवडीच्या पद्धतींची प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी मिळाली.**




### शाश्वत शेतीवर चर्चा

जलसंवर्धन, कार्यक्षम सिंचन आणि शाश्वत शेती यावर जपानी संशोधक व शहा फार्म्सच्या प्रतिनिधींमध्ये चर्चा झाली. स्थानिक शेतीच्या अनुभवांचीही देवाणघेवाण करण्यात आली.

शहा फार्म्सचे मालक ॲड. विजय शहा, प्रशांत शहा आणि डॉ. वार्तिका शहा यांच्याशी झालेल्या संवादादरम्यान शिष्टमंडळाने सिंचनाच्या पद्धती, भात लागवडीचे चक्र, पिकानुसार पाण्याची गरज तसेच सिंचनाचे प्रमुख स्रोत याबाबत सविस्तर चर्चा केली.

शहा फार्म्स ॲग्रीटुरिझमचे संचालक प्रशांत शहा यांनी भात लागवडीच्या विविध टप्प्यांची माहिती देताना फार्मवर अवलंबल्या जाणाऱ्या जलव्यवस्थापनाच्या वेगवेगळ्या पद्धतींविषयी चर्चा केली. शिष्टमंडळाने शिवार फेरी करत भातशेतीची पाहणी केली, तसेच शेतातील पाण्याची पातळी, खुल्या विहिरी, बोअरवेल, शेततळे आणि बंधारे यांसारख्या विविध सिंचन स्रोतांची माहिती घेतली.

स्थानिक जलस्रोतांचे व्यवस्थापन आणि प्रशासन याबाबतही शिष्टमंडळाने माहिती जाणून घेतली. यामध्ये पाटबंधारे खाते व ग्रामपंचायतीची भूमिका, जलस्रोतांची देखभाल तसेच शेतकऱ्यांना सहाय्य करणाऱ्या विविध शासकीय अनुदान योजना आणि उपक्रमांचा समावेश होता. ॲड. विजय शहा यांनी फार्म विकसित करण्याचा आपला अनुभव सांगताना गावकरी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी रोटरीच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांवरही प्रकाश टाकला.

कृषी आणि ॲग्रीटुरिझम केंद्र म्हणून शहा फार्म्सने ज्ञानाच्या देवाणघेवाणीसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. तसेच संशोधकांना ग्रामीण समुदायाशी जोडून स्थानिक शेती पद्धतींबद्दल अधिक माहिती करून देण्यास हातभार लावला. जलसंवर्धन, कार्यक्षम सिंचन आणि शाश्वत शेती याबाबत विचारांची व अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणण्यासाठी अशा संवादांचा उपयोग होऊ शकतो. तसेच सुधारित कृषी पद्धती आणि उपलब्ध शासकीय सहाय्यव्यवस्थेबाबत अधिक माहिती मिळाल्याने त्याचा शेतकऱ्यांनाही लाभ होऊ शकतो.

या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने पिठलं व भाकरी यांसारख्या अस्सल महाराष्ट्रीय ग्रामीण भोजनाचा आस्वाद घेत स्थानिक संस्कृती आणि आदरातिथ्याचाही अनुभव घेतला.

ही भेट कृषीविषयक ज्ञान आणि आंतरराष्ट्रीय अनुभवांच्या अर्थपूर्ण देवाणघेवाणीचे प्रतीक ठरली. संशोधन आणि स्थानिक पातळीवरील शेती यांच्यातील दुवा अधिक दृढ करण्यासोबतच, भविष्यातील शेती आणि ग्रामीण समुदायांसाठी शाश्वत जलव्यवस्थापनाचे महत्त्वही या भेटीतून अधोरेखित झाले.

# खड्डे बुजत नाहीत म्हणून महिलांनी खड्ड्यांनाच बांधली राखी

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**वारंवार तक्रारी करूनही रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याच्या निषेधार्थ आयटीनगर परिसरातील महिलांनी अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. रस्त्यावरील खड्ड्यांना राखी बांधून आणि ओवाळणी करून महिलांनी 'आता तूच आमचे रक्षण कर' असा उपरोधिक संदेश प्रशासनाला दिला.**



> अनेकदा मागणी करूनही संबंधित प्रशासन जागे होताना दिसत नाही. हजारो स्थानिक महिलांच्या वतीने उपहासात्मक आंदोलन करण्यात आले आहे. यामुळे संबंधित प्रशासनाने योग्य तो बोध घेण्याची अपेक्षा आहे.
>
> **- दीपाली शरद जांभुळकर, माजी उपसरपंच, हिंजवडी**

> माण परिसरातील रस्ते अनेक वर्षांपासून खड्ड्यांमुळे दुरवस्थेत आहेत. खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी आणि अपघाताला आमंत्रण मिळत आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन केले असून, प्रशासन जागे होईल अशी अपेक्षा आहे.
>
> **- माया यशराज पारखी, गृहिणी, आयटीनगरी, माण**

हिंजवडीच्या माजी उपसरपंच दीपाली जांभुळकर, माणचे भूमिपुत्र यशराज पारखी आणि शिवाजी भिलारे यांच्या नेतृत्वाखाली हे उपहासात्मक रक्षाबंधन आंदोलन करण्यात आले. रस्त्यांची दुरवस्था आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाकडे लक्ष वेधण्यासाठी महिलांनी हा अनोखा मार्ग अवलंबला.

हिंजवडी आणि माण परिसरातील अनेक रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून, त्याचा त्रास वाहनचालकांसह स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे. खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावतो आणि परिणामी परिसरातील वाहतूक कोंडीत आणखी भर पडते. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांची खोली लक्षात येत नसल्याने अपघाताचा धोकाही वाढला आहे.

रस्ते दुरुस्तीची मागणी स्थानिक नागरिक आणि महिलांकडून अनेकदा संबंधित प्रशासन, शासन तसेच लोकप्रतिनिधींकडे करण्यात आली आहे. मात्र, तक्रारी आणि मागण्यांनंतरही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नाही. त्यामुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महिलांनी खड्ड्यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले.

'खड्डे बुजविण्याऐवजी प्रशासनाने आता खड्ड्यांशीच नाते जोडले आहे का?' असा उपरोधिक सवालही या आंदोलनातून उपस्थित करण्यात आला. या अनोख्या आंदोलनाची परिसरात चर्चा असून, प्रशासन आता तरी रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत ठोस पावले उचलणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

"अनेकदा मागणी करूनही संबंधित प्रशासन जागे होताना दिसत नाही. हजारो स्थानिक महिलांच्या वतीने हे उपहासात्मक आंदोलन करण्यात आले आहे. प्रशासनाने यातून योग्य तो बोध घेऊन रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी," अशी अपेक्षा माजी उपसरपंच दीपाली शरद जांभुळकर यांनी व्यक्त केली.

माण परिसरातील रस्ते अनेक वर्षांपासून खड्ड्यांच्या समस्येने त्रस्त आहेत. खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी आणि अपघाताचा धोका निर्माण होत असल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक महिलांनी केली.



## भूमिका

**महाराष्ट्रात शिक्षणाच्या संधींचा विस्तार, डिजिटल शिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराची चर्चा जोरात सुरू आहे. मात्र, याच महाराष्ट्रात आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूलभूत गरजांसाठी आंदोलन आणि उपोषण करावे लागते, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.**

# आदिवासी विद्यार्थ्यांचा आक्रोश ऐकणार कोण?



पुणे, नाशिक आणि नागपूर येथे आदिवासी वसतिगृहांतील विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांसाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. त्यांच्या मागण्यांकडे केवळ प्रशासकीय प्रश्न म्हणून पाहणे अन्यायकारक ठरेल.

दुर्गम भागातून शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहे ही केवळ राहण्याची व्यवस्था नसून त्यांच्या शिक्षणाची आधारव्यवस्था आहे. त्यामुळे वसतिगृहांच्या नियमांमध्ये बदल करताना विद्यार्थ्यांची आर्थिक आणि सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे. काही जाचक अटी आंदोलनानंतर मागे घेण्यात आल्या, ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र, मूलभूत प्रश्न अजूनही कायम आहेत.

सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे तो भोजनाचा. वसतिगृहात पौष्टिक आणि दर्जेदार जेवण देण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या खात्यावर ठरावीक रक्कम जमा करण्याची पद्धत महागाईच्या काळात कितपत व्यवहार्य आहे, याचा शासनाने विचार करायला हवा. वाढत्या अन्नधान्याच्या किमतींच्या तुलनेत अपुरी रक्कम मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होणारच. शिक्षण घेणाऱ्या मुलांना दोन वेळच्या जेवणासाठी संघर्ष करावा लागणे ही कल्याणकारी राज्यासाठी निश्चितच लाजिरवाणी बाब आहे.

'पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयम' योजनेतील अनुदानाचाही महागाईच्या प्रमाणात पुनर्विचार होणे गरजेचे आहे. काही वर्षांपूर्वी ठरविलेली रक्कम आजच्या निवास, भोजन, प्रवास आणि शैक्षणिक खर्चाच्या तुलनेत अपुरी ठरते. उच्च शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना वास्तववादी आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे.

यासोबतच विद्यार्थ्यांची सुरक्षितता हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. आश्रमशाळांमध्ये सर्पदंशासारख्या घटना घडत असतील तर प्रशासनाने त्याकडे केवळ अपघात म्हणून पाहता कामा नये. सुरक्षित परिसर, नियमित तपासणी, तातडीची वैद्यकीय सुविधा आणि आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना अनिवार्य असायला हव्यात.

आदिवासी विद्यार्थ्यांचा प्रश्न केवळ वसतिगृहापुरता मर्यादित नाही. शिक्षणाचा दर्जा, शिक्षकांची उपलब्धता, डिजिटल सुविधा, पोषण आणि सुरक्षितता या सर्व बाबी परस्परांशी जोडलेल्या आहेत. केवळ शाळेत प्रवेश मिळणे म्हणजे शिक्षणाचा अधिकार पूर्ण होणे नव्हे.

आज विद्यार्थी 'आता नाही तर कधीच नाही' या भावनेने रस्त्यावर उतरले आहेत. त्यांचा आक्रोश दडपण्याऐवजी शासनाने संवाद साधून ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना आंदोलन करण्याची वेळच येऊ नये, अशी व्यवस्था निर्माण करणे हीच खरी लोककल्याणकारी शासनाची कसोटी आहे.

## प्रासंगिक »

### चुकीची सोय

**एका शहरातील सरकारी कार्यालयात देशमुख नावाचे अधिकारी होते. त्यांच्याकडे कामाचा मोठा ताण होता. एके दिवशी एका मंत्र्यांच्या जवळच्या व्यक्तीने फोन करून सांगितले, "माझा माणूस काही दिवस तुमच्या कार्यालयात ठेवा. तो तुमची खूप मदत करेल."**

देशमुखांनी नियम तपासले. त्या व्यक्तीची नियुक्ती करण्याची कोणतीही तरतूद नव्हती. तरीही वरिष्ठांकडून दबाव वाढत गेला. शेवटी देशमुखांनी स्पष्ट शब्दांत नकार दिला. काही दिवसांनी कार्यालयातील महत्त्वाची कागदपत्रे गायब झाल्याचे लक्षात आले.

चौकशी सुरू झाली. अनधिकृतपणे नेमलेल्या कर्मचाऱ्यांमुळे कागदपत्रांची गोपनीयता धोक्यात आल्याचे समोर आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देशमुखांना विचारले, "तुम्ही दबावाला बळी का पडलात नाही?" देशमुख शांतपणे म्हणाले, "सरकारी खुर्चीवर बसलो आहे, कोणाच्या वैयक्तिक खुर्चीवर नाही. आज नियम मोडून सोय केली असती, तर उद्या त्याची किंमत संपूर्ण कार्यालयाला मोजावी लागली असती." त्या घटनेनंतर कार्यालयात कोणालाही नियमबाह्य नियुक्ती देण्यात आली नाही.

- तात्पर्य : **क्षणिक सोयीसाठी नियम मोडले, तर त्याचे परिणाम संपूर्ण व्यवस्थेला भोगावे लागतात.**

महाराष्ट्रात रिक्षा आणि टॅक्सीचालकांना मराठीचे प्राथमिक ज्ञान असणे बंधनकारक करण्याच्या निर्णयावरून सध्या राजकीय वातावरण तापले आहे.

# मराठीचा आग्रह, पण अरेरावी नको



महाराष्ट्रात राहून, व्यवसाय करून दररोज असंख्य प्रवाशांशी संवाद साधणाऱ्या चालकांना स्थानिक भाषा समजणे आणि प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येणे ही अपेक्षा अवाजवी नाही. मात्र, भाषेचा प्रसार करताना सक्ती, दंड आणि कारवाई यापेक्षा संवाद व प्रशिक्षणाला प्राधान्य देणे अधिक परिणामकारक ठरेल.

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. त्यामुळे सार्वजनिक सेवेशी संबंधित व्यक्तींना मराठीचे किमान ज्ञान असणे आवश्यकच आहे. प्रवाशाला आपली समस्या सांगता यावी, चालकाला ती समजावी आणि गैरसमज टाळता यावेत, यासाठी भाषेचे ज्ञान महत्त्वाचे आहे. मात्र, एखाद्याला भाषा येत नाही म्हणून थेट कारवाई करण्यापेक्षा त्याला भाषा शिकण्यासाठी पुरेसा वेळ आणि योग्य सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. राज्य सरकारने चालकांसाठी मराठी भाषा वर्ग सुरू केले, ही सकारात्मक बाब आहे. मात्र हे वर्ग चालकांच्या कामाच्या वेळेनुसार, सोयीच्या ठिकाणी आणि व्यवहारातील मराठीवर केंद्रित असायला हवेत. प्रवाशांशी संवाद, पत्ते समजून घेणे, भाडे सांगणे, तक्रार ऐकणे अशा दैनंदिन व्यवहारासाठी आवश्यक मराठी शिकविणे अधिक उपयुक्त ठरेल. मुदतवाढ मिळाल्याने चालकांनीही या संधीचा सकारात्मक उपयोग करायला हवा. 'आम्ही मराठी शिकणारच नाही' अशी भूमिका घेणे निश्चितच योग्य नाही. महाराष्ट्राने विविध भाषा, धर्म आणि संस्कृतींना सामावून घेतले आहे. येथे येऊन रोजगार करणाऱ्यांनी स्थानिक भाषेचा आणि संस्कृतीचा आदर करणे अपेक्षित आहे. मराठी शिकणे म्हणजे स्वतःची मातृभाषा किंवा सांस्कृतिक ओळख सोडणे नव्हे. उलट, स्थानिक समाजाशी अधिक चांगला संवाद साधण्याचा तो मार्ग आहे.मात्र, या संपूर्ण वादाच्या निमित्ताने परिवहन विभागाच्या व्यापक कामकाजाकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठी शिकविण्याइतकाच महत्त्वाचा विषय म्हणजे सामान्य नागरिकांना सुलभ आणि पारदर्शक परिवहन व्यवस्था देणे. आरटीओ कार्यालयांमधील दलालांचा हस्तक्षेप, वाहन नोंदणी, परवाना, फिटनेस, हस्तांतरण आणि विविध परवान्यांसाठी होणाऱ्या फेऱ्या, ऑनलाइन सेवांमधील अडचणी याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

दलालमुक्त आरटीओ, पारदर्शक वाहन तपासणी, तक्रारींचे तातडीने निराकरण, वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी आणि रस्ते सुरक्षा हेही परिवहन विभागासमोरील तितकेच महत्त्वाचे प्रश्न आहेत. भाषा ही समाजाला जोडणारी शक्ती आहे; ती संघर्षाचे कारण ठरू नये. सरकारने 'सक्ती'पेक्षा 'सक्षम करण्यावर' भर द्यावा आणि चालकांनीही अरेरावीऐवजी शिकण्याची तयारी दाखवावी. मराठीचा सन्मान राखताना सामाजिक सलोखाही टिकवणे, हीच या संपूर्ण प्रकरणातील खरी कसोटी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



नव्हे आराणूक संवसारा हातीं ।
सर्वकाळ चित्तीं हा चि धंदा ॥१॥

देवधर्म सांदीं पडिला सकळ ।
विषयीं गोंधळ गाजतसे ॥ध्रु. ॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नेपाळमध्ये अडकले, अखेर महाराष्ट्रात परतले!

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या समन्वयातून सुरक्षित परतीची व्यवस्था; नागपुरात भाविकांचे आगमन

**महाईन्यूज | नागपूर**

**नेपाळ आणि तिबेट सीमावर्ती भागात आलेल्या महापुरामुळे अडकलेल्या महाराष्ट्रातील भाविकांना अखेर सुरक्षितपणे मायदेशी आणण्यात यश आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि मुख्यमंत्री कार्यालयाच्या सातत्यपूर्ण समन्वयामुळे भाविकांचा परतीचा प्रवास सुरळीत करण्यात आला. हे भाविक नागपूर रेल्वे स्थानकावर सुखरूप दाखल झाल्यानंतर आपल्या मूळ गावी रवाना झाले.**

नेपाळमध्ये महापुरामुळे महाराष्ट्रातील सुमारे २०० ते ४०४ नागरिक अडकले असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. त्यापैकी सुमारे १०० ते १२५ नागरिक सुरक्षित असल्याची माहिती मिळाली होती, तर सुमारे ६० जण बेपत्ता असल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. दरम्यान, १०५ नागरिक मायदेशी परतल्याची माहितीही समोर आली होती.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकाराने नेपाळमध्ये अडकलेल्या सुमारे १०० भाविकांच्या सुरक्षित परतीसाठी विशेष समन्वय करण्यात आला. नेपाळपासून पाटणापर्यंत त्यांच्या सुरक्षित प्रवासाची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर पाटणा येथून महाराष्ट्रात परतण्यासाठी रेल्वे प्रवासाची व्यवस्था करण्यात आली. सर्व भाविक पाटणाहून नागपूरच्या दिशेने रवाना झाले आणि अखेर सुरक्षितपणे नागपूर




रेल्वे स्थानकावर पोहोचले.

संकटाच्या काळात राज्य सरकार आणि मुख्यमंत्री कार्यालयाने सातत्याने संबंधित यंत्रणांशी संपर्क ठेवून भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले. आवश्यक मदत आणि प्रवासासाठी समन्वय साधण्यात आल्याने भाविकांना मोठा दिलासा मिळाला. नागपूर येथे पोहोचल्यानंतर भाविकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. संकटाच्या काळात सरकारने तातडीने दखल घेत मदतीसाठी पुढाकार घेतल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, भाविकांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधून सुरक्षित परतीची व्यवस्था केल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मदतकार्याबाबत माहिती देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्या प्रयत्नांमुळे नागरिकांना तातडीने मदत पोहोचवून भारतात परत आणणे शक्य झाल्याचे सांगितले.

परदेशात संकटात सापडलेल्या नागरिकांच्या सुरक्षित सुटकेसाठी केंद्र आणि राज्य यंत्रणांमध्ये झालेला समन्वय या घटनेतून अधोरेखित झाला आहे. भाविक सुखरूप महाराष्ट्रात परतल्याने त्यांच्या कुटुंबीयांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

### संकटात सरकारचा मदतीचा हात

महापुरामुळे परदेशात अडकलेल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी मुख्यमंत्री कार्यालयाने संबंधित यंत्रणांशी सातत्याने संपर्क ठेवला. तातडीची मदत आणि परतीच्या प्रवासासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली.

# मराठी सक्तीला आव्हान देणाऱ्या कॅबचालकांना हायकोर्टाचा दिलासा

**महाईन्यूज | मुंबई**

**महाराष्ट्र सरकारच्या मराठी भाषा शिकण्याच्या अनिवार्य नियमाला स्थगिती मिळावी यासाठी चार कॅब चालकांनी दाखल केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाने शनिवारी निकाली काढली. मराठी भाषा शिकण्यासाठीची मुदत एक वर्षाने वाढवण्याचा निर्णय सरकारने घेतल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आल्यानंतर न्यायालयाने याचिका निकाली काढली. आता तुमचा प्रश्न मिटला आहे. मराठी भाषा शिकण्यासाठी तुम्हाला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आल्याचे आम्ही वृत्तपत्रांत वाचल्याची टिप्पणी न्यायालयाने याचिका निकाली काढताना केली.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑटो-रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकण्यासाठी दिलेली मुदत एक वर्षाने वाढवण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती अतिरिक्त सरकारी वकील ज्योती चव्हाण यांनी प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाला दिली. त्याची नोंद घेऊन न्यायालयाने याचिका निकाली काढली.

रिक्षा- टॅक्सी आणि कॅब चालकांच्या एका शिष्टमंडळाने गुरुवारी भेट घेतल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुदतवाढीची घोषणा केली होती. यामुळे मराठी न येणाऱ्या चालकांवरील तात्काळ कारवाई थांबली आणि त्यांना भाषा शिकण्यासाठी अधिक वेळ मिळाला होता. दरम्यान, वकील विवेक शुक्ला यांच्यामार्फत चार कॅब चालकांनी जनहित याचिका दाखल करून, १२ ऑगस्ट रोजी काढण्यात आलेल्या सरकारी अधिसूचनेला आव्हान दिले होते. तसेच, ही अधिसूचना



नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारी असल्याचा दावा केला होता.

मोहम्मद कासिम अहमद, मोहम्मद तौसीफ शेख, सियाद अहमद आणि सादिक नासिर अली खान या कॅब चालकांनी केलेल्या याचिकाकेनुसार, हा नियम संविधानातील कलम १४ (समानतेचा अधिकार), १९ (व्यापार आणि व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य) आणि २१ (जगण्याचा अधिकार) अन्वये असलेल्या त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारा आहे. तसेच, हा नियम 'मोटार वाहन कायद्या'च्या तरतुदींशी विसंगत आहे. या कायद्यात वाहन चालवण्याच्या परवान्यासाठी कोणत्याही भाषेची अट नमूद केलेली नाही.

"मोटार वाहन कायदा राज्य सरकारला चालकासाठी एखाद्या भाषेचे व्यावहारिक ज्ञान असणे ही पात्रता, बिल्ला मिळवण्याची अट किंवा परवान्याची अट म्हणून निश्चित करण्याचा अधिकार देत नाही. त्याचप्रमाणे, अशा कारणास्तव बिल्ला निलंबित करण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकारही देत नाही, असा दावाही याचिकेत करण्यात आला होता. मराठीच्या 'व्यावहारिक ज्ञाना'च्या नियमाच्या अंमलबजावणीमुळे स्वतःसह लाखो गरीब आणि स्थलांतरित चालकांचा बिल्ला निलंबित होण्याचा आणि परवाने रद्द होण्याचा धोका निर्माण झाला आहे. याचा परिणाम त्यांच्या उपजीविकेवर होईल, असा दावा करून याचिकाकर्त्यांनी या निर्णयाच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्याची विनंती याचिकेद्वारे उच्च न्यायालयाकडे केली होती.

### रोजगारावर परिणामाची भीती

मराठीच्या नियमामुळे बिल्ला निलंबित किंवा परवाना रद्द होऊन गरीब व स्थलांतरित चालकांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची शक्यता याचिकेत व्यक्त करण्यात आली होती.

### मूलभूत अधिकारांचा मुद्दा

मराठी भाषेची अट संविधानातील कलम १४, १९ आणि २१ मधील मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारी असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता.

# समय रैना पुन्हा वादाच्या भोवऱ्यात

## बिहारींसह काश्मिरी पंडितांवर केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यांवर सोशल मीडियावर तीव्र आक्षेप

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**स्टँड-अप कॉमेडियन समय रैना पुन्हा एकदा मोठ्या वादात सापडला आहे. यावेळी बिहारमधील नागरिक आणि काश्मिरी पंडितांशी संबंधित केलेल्या वक्तव्यांमुळे हा वाद निर्माण झाला आहे. समय रैनाच्या 'इंडियाज गॉट लैटेंट' (सीझन २) या शोचा नवा एपिसोड प्रदर्शित झाल्यानंतर यावरून गदारोळ सुरू झाला आहे. या शोचे काही भाग सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून, त्यात केलेल्या टिप्पणींवर राजकीय नेत्यांसह सर्वसामान्यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.**



'इंडियाज गॉट लैटेंट'च्या नवीन भागात समय रैना स्टँड-अप कॉमेडियन शेरोन वर्माची ओळख करून देताना तिच्या बिहारी पार्श्वभूमीवर विनोद करतो. समय म्हणाला, "ही बिहारची आहे आणि इतकी बिहारी आहे की तिला वाटतं 'इबोला' म्हणजे कोणीतरी काहीतरी बोललं (ई बोला)." यावर प्रत्युत्तर देताना शेरोनने समयच्या काश्मिरी मूळ असण्यावर निशाणा साधला. ती म्हणाली, "समय इतका काश्मिरी आहे की त्याला स्वतःवर दगड भिरकावून घेणे (दगडफेक करणे) आवडते."

या वादावर 'विश्व काश्मिरी समाजा'चे संयोजक किरण वट्टल म्हणाले की, "हे लोक जे विनोदी कार्यक्रम करतात, ते केवळ एक नाटक किंवा सोंग करत असतात. अशा कार्यक्रमांमध्ये त्यांना श्रद्धा, तत्त्वे किंवा सदसद्विवेकबुद्धी याचे काहीही देणेघेणे नसते. आपल्या कार्यक्रमासाठी ते कोणाचीही, अगदी अन्याय सहन केलेल्या लोकांचीही थट्टा करू शकतात. नेमके हेच समयने केले. ३६ वर्षे हालअपेष्टा सोसलेल्या, आपल्या घरांतून विस्थापित झालेल्या आणि मुळांपासून तोडल्या गेलेल्या एखाद्या व्यक्तीची किंवा समुदायाची थट्टा केल्याने आपला टीआरपी (TRP) वाढेल, असे त्याला वाटले. परंतु, आमचा संपूर्ण समुदाय त्याला चोख आणि सडेतोड उत्तर देईल."

या भागात अभिनेत्री अर्चना पूरन सिंह आणि 'ओरी' (ऑर्हान आवत्रमाणी) हे देखील परीक्षक म्हणून उपस्थित होते. शोदरम्यान ए. आर. तिवारी या स्पर्धकाने भोजपुरी शायरी आणि रॅप सादर केले. तो व्हॉगिंग करतो असे सांगितल्यावर समयने अर्चना पूरन सिंह यांच्या व्हॉग्सचा संदर्भ देत टोमणा मारला, "व्हॉगिंग करायला कसले टॅलेंट लागते?". यावर अर्चना पूरन सिंह यांनी समयला तत्काळ रोखठोक प्रत्युत्तर दिले.

### फुकटची प्रसिद्धी मिळवणे ही काहींची प्रवृत्ती

"काहीही बोलून फुकटची प्रसिद्धी मिळवणे ही काहींची प्रवृत्ती बनली आहे. प्रसिद्ध होणे हाच त्यांचा एकमेव हेतू असतो. सनातन हिंदू धर्माच्या देवी-देवता आणि काश्मिरी पंडित हे उपहासाचे विषय असू शकत नाहीत, हे सर्वांनी समजून घेतले पाहिजे," अशा शब्दांत भाजप आमदार राम कदम यांनी आक्षेपार्ह विधानांचा समाचार घेतला. "आधी जाणीवपूर्वक आक्षेपार्ह बोलायचे आणि नंतर माफी मागायची, यामुळे त्यांना देशभरात फुकटची प्रसिद्धी मिळून जाते," असा टोलाही त्यांनी लगावला.

### काश्मिरी पंडितांच्या विस्थापनाचा उल्लेख

यावर समय म्हणाला, "शेरोन ही अशी बिहारी आहे जी नोकरीच्या शोधात मुंबईत आली. ही खरंच बिहारियांसारखी गोष्ट आहे." त्यावर उत्तर देताना शेरोन म्हणाली, "किमान मी माझे घर स्वतःच्या मर्जीने तरी सोडले." समय रैना हा मूळचा काश्मीरचा असून, ९० च्या दशकात काश्मिरी पंडितांचे झालेले विस्थापन हा आजही संवेदनशील विषय आहे; त्यामुळे या वक्तव्यावरून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# पुरात वाहून आला बँकेचा लॉकर, लोकांनी तोडून काढले ९२ लाख रुपये

**महाईन्यूज । नेपाळ**

**नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुरामुळे हाहाकार उडाला असताना माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटनाही समोर आल्या आहेत. रसुवा परिसरातून भोटेकोशी नदीच्या जोरदार प्रवाहात वाहून त्रिशूली नदीपर्यंत आलेला बँकेचा लॉकर फोडून त्यातील पैसे चोरल्याच्या आरोपावरून पोलिसांनी 29 जणांना ताब्यात घेतले आहे.**



याशिवाय पुराच्या पाण्यात वाहून आलेल्या एका मृत महिलेच्या कानातील सोन्याच्या बाळ्या चोरल्याच्या आरोपावरून आणखी दोघांना अटक करण्यात आली आहे. रसुवा जिल्ह्यातील भोटेकोशी परिसरातून पुराच्या वेगवान प्रवाहात बँकेची एक जड तिजोरी वाहून गेली होती. त्यानंतर हा लॉकर धादिंग जिल्ह्यातील गल्छी गावपालिका-4 येथील बेलखूखोला परिसरातील त्रिशूली नदीच्या काठावर वाहून आला. धादिंग पोलिसांना नदीकाठी पडलेला हा लॉकर स्थानिक लोक तोडून त्यातील पैसे काढत असल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच नेपाळ पोलीस आणि सशस्त्र प्रहरी बलाच्या संयुक्त पथकाने घटनास्थळी छापा टाकला.

या आपत्तीच्या काळात माणुसकीला काळिमा फासणारी आणखी एक घटना नारायणी नदीजवळ समोर आली आहे. पुराच्या पाण्यात वाहून आलेल्या एका मृत महिलेच्या मृतदेहातून दोन व्यक्तींनी सोन्याच्या बाळ्या काढून घेतल्या. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन्ही आरोपींना अटक केली. नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम कमीकरण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाने (NDRRMA) शनिवारी आकडेवारी अपडेट केली. त्यानुसार, नेपाळमध्ये आलेल्या या भीषण आपत्तीमध्ये आतापर्यंत 626 जणांचे मृतदेह सापडले आहेत. दरम्यान, बेपत्ता व्यक्तींच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. शुक्रवारी रात्रीपर्यंत 1,924 जण बेपत्ता असल्याची माहिती होती. मात्र, शनिवारी हा आकडा वाढून 2,426 वर पोहोचला आहे. बेपत्ता व्यक्तींमध्ये 517 परदेशी नागरिकांचाही समावेश आहे. पुरामुळे प्रभावित झालेल्या भागांमध्ये मदत आणि बचावकार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.

### 92 लाखांहून अधिक नेपाळी रुपये जप्त

पोलिसांनी तातडीने कारवाई करत घटनास्थळावरून 29 जणांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून 92,68,505 नेपाळी रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. धादिंग पोलिसांच्या माहितीनुसार, पकडण्यात आलेल्या बहुतांश आरोपींचे वास्तव्य गल्छी-4 येथील मास्टर गावात आहे. काही आरोपी गल्छी-6 येथील आदमघाट आणि सिद्धलेक-7 येथील आदमटार येथील रहिवासी आहेत. याशिवाय चितवन आणि पर्सा येथील काही लोकांचाही यामध्ये समावेश आहे, जे सध्या धादिंगमध्ये राहत होते.

# सुजलेला चेहरा आणि ओठावर दुखापत?



बंगाली अभिनेत्री मिमी चक्रवर्तीने सोशल मीडियावर काही फोटो शेअर केले आहेत. ज्यानंतर चाहत्यांकडून तिची काळजी व्यक्त केली जात आहे. अभिनेत्रीने शेअर केलेल्या फोटोंमध्ये तिचा चेहरा सुजलेला दिसत असून ओठांवर दुखापतीच्या खुणा दिसत आहेत. इंस्टाग्रामवर हे फोटो शेअर करत तिने घडलेल्या प्रसंगाची माहिती दिली आहे, त्यानंतर चाहते कमेंट्स करून ती लवकरात लवकर बरी व्हावी अशी प्रार्थना करत आहेत. एका फोटोमध्ये तिचे गाल सुजलेले आणि ओठावर दुखापत दिसत आहे, तर दुसऱ्या एका फोटोत पायाला दुखापत झाल्याचे दिसत आहे. हे फोटो पाहून 'नेमकं काय घडलं?' असा प्रश्न सर्वजण विचारू लागले आहेत. अभिनेत्रीच्या ओठांवर थोडीशी जखमही दिसत आहे. हे फोटो शेअर करत अभिनेत्रीने तिच्या शरीरावर सूज का आली, याचे कारण स्पष्ट केले. फोटो शेअर करताना मिमी चक्रवर्तीने कॅप्शनमध्ये लिहिले, 'एक दात काढला आहे. त्यामुळे गाल सुजलेला आहे. काही टाके पडले आहेत. ओठावर जखम आहे. पायात गोळे येत आहेत. विस्कटलेले केस, विना-मेकअपचा चेहरा, कॉफी आणि माझा कुत्रा.' कॅमेऱ्याच्या मागे कोणतीही ग्लॅमर टीम नाही. एका सामान्य माणसाच्या आयुष्यातील अत्यंत सामान्य आठवडा.

# क्रिती सेनॉनचा ट्रोलर्सवर थेट वार!



बॉलिवूडची आघाडीची अभिनेत्री क्रिती सेनॉनने नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका रक्षाबंधन जाहिरातीवरून सुरू असलेल्या वादावर आपल्या खास शैलीत भाष्य केले आहे. तिने आपली बहीण नुपूर सेनॉनसोबत रक्षाबंधन साजरे करतानाचे छायाचित्र समाजमाध्यमांवर शेअर केले असून, सणांच्या पोशाखावरून निरर्थक वाद घालणाऱ्या कथित 'राखी फॅशन समिती'ची फिरकी घेत टीकाकारांना टोला लगावला आहे. सदर जाहिरातीतील पेहरावावरून क्रिती सेनॉनवर समाजमाध्यमांवरून मोठ्या प्रमाणावर टीका केली जात होती. या वादावर तिने यापूर्वीच आपली भूमिका स्पष्ट करत, सणांचे मूळ महत्त्व हे कपड्यांमध्ये नसून त्यामागील भावना आणि परंपरांमध्ये दडलेले असते, असे म्हटले होते. आता नुपूरसोबतचा राखी बांधतानाचा फोटो शेअर करत तिने लिहिले, "राखी फॅशन समितीच्या बैठका अजूनही सुरूच असल्या, तरी आम्ही मात्र प्रत्यक्ष महत्त्वाच्या असणाऱ्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करत आहोत. तुम्हा सर्वांना रक्षाबंधनानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!" एका ब्रँडच्या रक्षाबंधन मोहिमेसाठी क्रितीने 'ऑफ-व्हाइट' रंगाचा वैशिष्ट्यपूर्ण आधुनिक पोशाख परिधान केला होता, ज्यामध्ये ब्रॅलेट- शैलीतील ब्लाउज, केप आणि ड्रेप्ड स्कर्टचा समावेश होता.

# माझ्यावर कधीच कोणी प्रेम केलं नाही



अभिनेत्री नीना गुप्ता या त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखल्या जातात. त्या अनेकदा त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याबद्दल मोकळेपणाने बोलताना दिसतात. नुकत्याच एका मुलाखतीत त्यांनी प्रेम, नाती आणि त्यांच्या पहिल्या लग्नाबद्दल काही खास आठवणी सांगितल्या. यावेळी त्यांनी आयुष्यात अनुभवलेल्या प्रेमाबद्दलही मनातील भावना व्यक्त केल्या. नीना गुप्ता यांचे पहिले लग्न अमलान कुसुम घोष यांच्यासोबत झाले होते. मात्र, त्यांचे हे लग्न फार काळ टिकले नाही. नुकत्याच झालेल्या मुलाखतीत त्यांनी या नात्याशी संबंधित काही जुन्या आठवणींना उजाळा दिला. आपल्या पहिल्या प्रेमाची आठवण सांगताना नीना गुप्ता यांनी कॉलेजमधील एक किस्सा सांगितला. त्यांनी सांगितले की, आयआयटीमध्ये काम करणाऱ्या एका तरुणावर त्या पहिल्यांदा प्रेमात पडल्या होत्या. पुढे याच व्यक्तीसोबत त्यांनी लग्न केले. कॉलेजमध्ये असताना एकदा दोघांनी चित्रपट पाहायला जाण्याचे ठरवले होते. मात्र, नीना यांनी ही गोष्ट चुकून एका मैत्रिणीला सांगितली. त्या मैत्रिणीने नीना यांच्या आईला याबद्दल सांगितले. त्यानंतर त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना चित्रपटाला जाण्याची परवानगी दिली नाही. त्या काळात आजच्यासारखी मोबाईल आणि सहज उपलब्ध संवादाची साधने नव्हती. त्यामुळे नीना यांना चित्रपटाला जाता येणार नसल्याचे त्या तरुणाला सांगता आले नाही. परिणामी, तो बराच वेळ त्यांची वाट पाहत राहिला. प्रेमाबद्दल बोलताना नीना गुप्ता यांनी आपल्या आयुष्यातील भावनिक अनुभवांबाबत प्रामाणिकपणे मत मांडले. त्या म्हणाल्या की, चित्रपटांमध्ये किंवा पुस्तकांमध्ये ज्या प्रकारचे प्रेम दाखवले जाते, तसा अनुभव त्यांना प्रत्यक्ष आयुष्यात कधीच आला नाही. त्यांनी सांगितले की, त्यांच्यावरही कधी कुणी त्या अर्थाने प्रेम केले नाही. त्यांच्या मते, प्रेम करण्यासाठी समोरच्या व्यक्तीकडूनही तितक्याच तीव्र भावना असणे गरजेचे आहे. आपल्या आयुष्यात आपल्यासाठी वेडं होईल, अशा प्रकारचं प्रेम करणारी व्यक्ती त्यांच्या कधी भेटली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. नीना यांच्या या वक्तव्यामुळे वैयक्तिक आयुष्याकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे. मात्र, त्यांनी आपल्या भूतकाळाकडे पाहताना कोणतीही कटुता व्यक्त करण्याऐवजी आपल्या अनुभवातून शिकण्यावर भर दिला. नीना गुप्ता आपली मुलगी मसाबा गुप्तासोबतच्या नात्याबद्दलही अनेकदा बोलताना दिसतात. या मुलाखतीत त्यांनी मसाबाला वैयक्तिक भावना आणि भूतकाळाबाबत महत्त्वाचा सल्ला दिल्याचे सांगितले. नीना यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीने आपल्या काही वैयक्तिक भावना स्वतःपुरत्या ठेवायला शिकले पाहिजे. आपल्या आयुष्यातील प्रत्येक गोष्ट इतरांसोबत शेअर करणे आवश्यक नसते. विशेषतः भूतकाळातील गोष्टींमध्ये अडकून न पडता वर्तमानात जगणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्या सांगतात. नात्यांमध्ये भावनिक जवळीक आणि संवाद महत्त्वाचा असला तरी प्रत्येक भावना सर्वांसमोर व्यक्त करणे गरजेचे नसते, असे नीना यांचे मत आहे. आयुष्यात अनेक अनुभव येतात. काही अनुभव चांगले असतात, तर काही गोष्टींचा पश्चात्तापही होऊ शकतो. मात्र, सतत भूतकाळाचा विचार करत राहण्यापेक्षा वर्तमानावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. नीना गुप्ता यांच्या या वक्तव्यामुळे त्यांच्या आयुष्यातील प्रेम आणि नात्यांचा प्रवास पुन्हा चर्चेत आला आहे. त्यांच्या अनुभवातून त्यांनी प्रेमाबरोबरच स्वतःच्या भावनांकडे पाहण्याचा आणि वर्तमानात जगण्याचा संदेशही दिला आहे.

# नामिबियाचा आफ्रिकेला पुन्हा दणका

## नामिबियाने दक्षिण आफ्रिकेसारख्या बलाढ्य संघाला पुन्हा एकदा नमवलं

**महाईन्यूज । आफ्रिका**

**‘आम्ही लिंबूटिंबू नाही’ हे पुन्हा एकदा सिद्ध करत नामिबियाने तिरंगी मालिकेत बलाढ्य दक्षिण आफ्रिकेवर १८ धावांनी दिमाखदार विजय मिळवला. गेल्या वर्षी एकमेव टी२० सामन्यात नामिबियाने दक्षिण आफ्रिकेला नमवण्याची किमया केली होती. त्यावेळी तो एका सामन्याचा चमत्कार मानला गेला. मात्र वर्षभरात सख्खे शेजारी नामिबियाने आफ्रिकेला चीतपट केला.**



आफ्रिकेचा कर्णधार ब्युऑन फॉर्च्युनने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला. नामिबियाचा सलामीवीर जॅन फ्रायलिंकने ३८ चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांनिशी ६० धावांची तडाखेबंद खेळी केली. लोरेन स्टीनकॅम्पने २९ चेंडूत ४१ धावांची खेळी केली. या दोघांनी ८४ धावांची खणखणीत सलामी दिली. ही जोडी फुटल्यानंतर नामिबियाची घसरगुंडी उडाली. दक्षिण आफ्रिकेतर्फे प्रेरलन सुब्रयानने ३ तर ड्युऑन यान्सन आणि ब्युऑन फॉर्च्युन यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या. नामिबियाने १६३ धावांची मजल मारली. दक्षिण आफ्रिका या आव्हानाचा पाठलाग करेल असं चित्र होतं. मात्र डेवाल्ड ब्रेव्हिसचा अपवाद वगळता आफ्रिकेच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही.

धडाकेबाज फलंदाज ल्युहान डी प्रिटोरस ९ धावा करून तंबूत परतला. टोनी द झोरीही मोठी खेळी करू शकला नाही. कॉनर इस्थरझ्युइनकडून अपेक्षा होत्या मात्र तो ४ धावा करून माघारी परतला. साथीदार नियमित अंतरात बाद होत असतानाही ब्रेव्हिसने चौकार, षटकारांची लयलूट सुरूच ठेवली. ब्रेव्हिस खेळपट्टीवर असेपर्यंत आफ्रिकेला विजयाची आशा होती. 18व्या षटकात ट्रम्पलमानने ब्रेव्हिसला बाद केलं आणि आफ्रिकेच्या विजयाची आशा मावळल्या. ब्रेव्हिसने ५० चेंडूत ४ चौकार आणि ६ षटकारांसह ७५ धावांची खेळी केली. ड्युआन यान्सनने २५ धावा करत ब्रेव्हिसला साथ देण्याचा प्रयत्न केला. नामिबियातर्फे रुबेन ट्रम्पलमान आणि जेजे स्मूट यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. नामिबियात आयोजित तिरंगी मालिकेतला हा पहिलाच सामना होता. झिम्बाब्वे या स्पर्धेतला तिसरा संघ आहे. दक्षिण आफ्रिकेने या स्पर्धेसाठी सर्व प्रमुख खेळाडूंना विश्रांती दिली आहे. यामुळे ब्युऑन फॉर्च्युनकडे नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली आहे. आशिया चषकाच्या धर्तीवर आफ्रिका चषकसदृश स्पर्धा आयोजित करण्याचा हा प्रयत्न आहे.

गेल्या वर्षी आफ्रिकेच्या संघाने नामिबियाविरुद्ध एकमेव सामना खेळला होता. त्या सामन्यात आफ्रिकेला १३४ धावाच करता आल्या होत्या. नामिबियाने ६ विकेट्सच्या मोबदल्यात हे लक्ष्य गाठलं होतं.

### डेवाल्ड ब्रेव्हिसची अपयशी झुंज

नामिबियाच्या या विजयाने त्यांच्या संघातील आत्मविश्वास आणखी उंचावला आहे. दक्षिण आफ्रिकेसारख्या बलाढ्य संघाविरुद्ध मिळवलेला हा विजय नामिबियाच्या क्रिकेटसाठी महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. विशेषतः फ्रायलिंक आणि स्टीनकॅम्प यांच्या दमदार सुरुवातीने संघाला भक्कम धावसंख्या उभारून दिली. त्यानंतर गोलंदाजांनी अचूक मारा करत दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांवर सातत्याने दबाव कायम ठेवला. डेवाल्ड ब्रेव्हिसने एकाकी झुंज देत सामना रंगतदार करण्याचा प्रयत्न केला, मात्र ट्रम्पलमानच्या निर्णायक विकेटने सामन्याचे पारडे नामिबियाच्या बाजूने झुकले.

# दुखापतीचे शुक्लकाष्ठ कायम, नीरज चोप्रा आशियाई क्रीडा स्पर्धेला मुकणार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अभ्यास सत्रादरम्यान घोट्याचे स्नायू (लिगामेंट) फाटल्यामुळे भारताचा स्टार भालाफेकपटू आणि दोन वेळचा ऑलिम्पिक पदकविजेता नीरज चोप्रा २०२६ च्या संपूर्ण उर्वरित हंगामातून बाहेर पडला आहे. या दुखापतीमुळे त्याला आगामी आशियाई क्रीडा स्पर्धा आणि डायमंड लीग फायनलला मुकावे लागणार असून, लय सापडत असतानाच त्याचा २०२६ वर्षाचा हंगाम दुर्दैवाने समाप्त झाला आहे.**




२८ वर्षीय नीरजने दुखापतीच्या दीर्घ विश्रांतीनंतर जूनमध्ये दोहा डायमंड लीगद्वारे पुनरागमन केले होते, जिथे तो ८५.६९ मीटर फेकीसह चौथ्या स्थानावर राहिला. यानंतर ग्लासगोमध्ये ८५.८३ मीटर कामगिरीसह त्याने रौप्यपदक जिंकले आणि लॉझेनमध्ये मोसमातील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली.

पुनरागमन करताना नीरजची कामगिरी संमिश्र राहिली. ग्लासगोमध्ये त्याने पदक निश्चित केले असले तरी श्रीलंकेच्या रुमेश पाथिरागेने ८९.७५ मीटरचा लांब फेक करत सुवर्णपदक पटकावले. लॉझेनमधील स्पर्धा ही आशियाई खेळांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची पायरी मानली जात होती, मात्र हीच त्याची २०२६ मधील शेवटची स्पर्धा ठरली.या दुखापतीमुळे डायमंड लीग फायनल खेळण्याच्या त्याच्या आशांवरही पाणी फेरले गेले आहे. गुणतालिकेत सातव्या स्थानावर असलेला नीरज अंतिम फेरीच्या शर्यतीत कायम होता.

जपानमधील आयची-नागोया येथे १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत नीरजच्या अनुपस्थितीमुळे भारताला मोठा फटका बसला आहे. आपल्या जेतेपदाचा बचाव करण्याची संधी आता त्याच्या हातातून निसटली आहे. नीरजच्या माघारीनंतर आता सर्वांच्या नजरा रोहित यादववर खिळल्या आहेत. रोहितने नुकताच भुवनेश्वर येथील 'वर्ल्ड ॲथलेटिक्स सिल्व्हर लेव्हल कंटिनेंटल टूर'मध्ये ८७.६८ मीटरची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले होते. त्यामुळे नीरजच्या अनुपस्थितीत भालाफेक प्रकारात रोहित भारताचे प्रतिनिधित्व करणारा प्रमुख खेळाडू असेल.

### नीरजने इंस्टा पोस्टने के हंगाम संपवत असल्याचे जाहीर

लॉझेन डायमंड लीगमध्ये नीरजने या वर्षातील तिसऱ्या स्पर्धेत मोसमातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केली होती. मात्र, २९ ऑगस्ट रोजी इंस्टाग्रामवरील एका पोस्टद्वारे त्याने हंगाम संपवत असल्याचे स्पष्ट केले."दुर्दैवाने, सरावादरम्यान माझ्या घोट्याचे लिगामेंट टियर (स्नायू फाटणे) झाले. डॉक्टर आणि माझ्या टीमसोबत चर्चा केल्यानंतर, मी या मोसमातील उर्वरित स्पर्धांमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे," असे नीरजने नमूद केले.

ADMISSION OPEN

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

Employability Enhancement Foundational Course In

Artificial Intelligence
in Embedded System Design.

Eligibility : Second Year Passed B.Sc. (Electronics), Diploma (E&TC /Electronics), B.E./B.Tech (E&TC/Electronics), or Equivalent



- 10000+ STUDENTS SUCCESSFULLY COMPLETED OUR VARIOUS COURSES
- 25 YEARS OF EXPERIENCE IN EDUCATION
- 100% PLACEMENT ASSISTANCE

Scan the QR code!

Register Now https://www.icit.org.in

VLSI DESIGN & RESEARCH CENTRE

VLSI | Savitribai Phule Pune University | iCiT

Integrated Circuit and Information Technology Pvt. Ltd.,

Department of Electronics and Instrumentation Science,
Savitribai Phule Pune University, Pune 411007
Contact : 8669668900/100, 9922219219
Email : info@icit.org.in /

# राहुल साबळे कुटुंबाला ५ लाखांची मदत

## आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते मदतीचा धनादेश मृत कामगाराच्या कुटुंबियांकडे सुपुर्त

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**स्वातंत्र्यदिनानिमित्त केलेली विद्युत रोषणाई उतरवताना कासारवाडी 'ह' क्षेत्रीय कार्यालयाच्या छतावरून पडून दुर्दैवी मृत्यू झालेल्या कामगार राहुल साबळे यांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली आहे. शनिवारी (२९ ऑगस्ट) आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते या मदतीचा धनादेश मृत कामगाराच्या पत्नी आणि वडिलांकडे सोपवण्यात आला.**



काळेवाडीतील विजयनगर येथील रहिवासी असलेले राहुल साबळे (वय ४३) हे एका कंत्राटदार कंपनीत कार्यरत होते. १५ ऑगस्टनिमित्त कासारवाडी येथील 'ह' प्रभाग क्षेत्रीय कार्यालयाच्या दोन मजली पत्र्याच्या छतावर चढून विद्युत रोषणाई उतरवण्याचे काम सुरू असताना, त्यांचा पाय घसरून ते थेट खाली कोसळले. या दुर्घटनेत गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. या अचानक घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे साबळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.

पोटाची खळगी भरण्यासाठी काम करताना प्राण गमावलेल्या कष्टाळू कामगाराच्या कुटुंबाला सावरण्यासाठी आणि दिलासा देण्यासाठी आमदार जगताप पुढे आले. त्यांनी संपूर्ण प्रकारची माहिती घेतली. या साबळे कुटुंबाला सावरण्यासाठी तात्काळ आर्थिक मदत देऊन आधार दिला . २९ ऑगस्ट रोजी पिंपळे गुरव येथील जनसंपर्क कार्यालयात आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते हा धनादेश कुटुंबाला देण्यात आला. यावेळी कै. राहुल यांच्या पत्नी संगीता राहुल साबळे, तसेच वडील विठ्ठल महादू साबळे यावेळी उपस्थित होते. त्यांच्याकडे धनादेश सुपुर्त करण्यात आला आहे

या वेळी ह प्रभाग अध्यक्षा तृप्ती कांबळे तसेच परिसरातील स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. जगताप यांनी यावेळी साबळे कुटुंबीयांचे सांत्वन करत या कठीण काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही दिली.

> "राहुल साबळे यांचा झालेला अपघात अत्यंत दुर्दैवी आणि मनाला चटका लावणारा आहे. कुटुंबातील कर्ता पुरुष अचानक निघून गेल्याने साबळे कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. जिवाचे मोल कोणत्याही मदतीने भरून निघू शकत नाही; परंतु या दुःखाच्या काळात त्यांच्या कुटुंबाला सावरण्यासाठी आणि थोडासा आर्थिक आधार मिळावा यासाठी ही मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला आहे. या कठीण प्रसंगात आम्ही साबळे कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत."
>
> - शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा

# पिंपरी चिंचवड मनपा मोरवाडी ITI च्या प्रशिक्षणार्थ्याची सौदीत निवड

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सन 2021- 23 सत्रातील ड्राफ्ट्समन मेकॅनिकल या ट्रेडचा प्रशिक्षणार्थी असिफ अल्लाउद्दीन मुलानी याची सौदी अरेबिया मधील दमाम येथे जूनियर डिझायनर म्हणून निवड झाली. हा प्रशिक्षणार्थी आयटीआय मध्ये प्रथम व द्वितीय अंतिम परीक्षेत प्रथम आला होता या निकषावर त्याला इनप्रो कंपनीमध्ये शिकाऊ उमेदवारी प्राप्त झाली. नंतर याच कंपनीमध्ये ट्रेनि म्हणून निवड झाली.**



उत्कृष्ट कामकाज, तांत्रिक कौशल्य व प्रामाणिकता याचे मूल्यमापन करून इनप्रो कंपनीने सौदी अरेबिया येथील मुख्य कंपनीमध्ये असिफ ची ज्युनियर डिझायनर म्हणून निवड केली आहे व याबाबतचा सर्व आवश्यक खर्च कंपनी करणार आहे.

सदर प्रशिक्षणार्थ्याचे पालक हयात नसताना व हलाखीच्या परिस्थितीत त्याने उत्तुंग यश संपादन केले आहे. त्याची प्रेरणा घेऊन त्याच्या बहिणीने देखील मोरवाडी आयटीआय मध्ये चालू शैक्षणिक क्षेत्रात ड्राफ्ट्समन मेकॅनिकल या ट्रेडला प्रवेश घेतला आहे तसेच असिफचा आतापर्यंतचा संघर्ष व प्रवास इतर विद्यार्थ्यांना देखील प्रेरणादायी आहे. मनपा आयटीआय मारवाडी अशा विद्यार्थ्यांना नेहमीच प्रोत्साहन देते व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे उज्वल करिअर घडविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. कुलदीप जंगम अतिरिक्त आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या सूचनेनुसार व मार्गदर्शनाखाली लवकरच विभाग अंतर्गत परदेशी शिक्षण व रोजगार हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येणार आहे.

असिफ ने मिळवलेल्या यशाबद्दल व त्याच्या पुढील वाटचालीस प्राचार्य शशिकांत पाटील, गटनिदेशक ओव्हाळ आर. एस., निदेशक काळोखे व्ही. व्ही. सर्व गटनिदेशक व निदेशक यांनी हार्दिक अभिनंदन व खूप साऱ्या शुभेच्छा दिल्या.

# ज्ञानदीप बालगृहात NSS स्वयंसेवकांचा रक्षाबंधन सोहळा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

सामाजिक बांधिलकी आणि आपुलकीचा संदेश देत डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी येथील NSS UNIT A-106 च्या स्वयंसेवकांनी दिघी येथील 'ज्ञानदीप बालगृहात' रक्षाबंधनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. ५८ NSS स्वयंसेवकांच्या सहभागाने रंगलेल्या या सोहळ्यात बालगृहातील मुलांसोबत राखी बांधून आपुलकीचा स्नेहबंध अधिक दृढ करण्यात आला.

प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाल्यानंतर स्वयंसेवकांनी मुलांच्या हातावर राख्या बांधून मिठाई वाटप केली. यानंतर अभंग, समूहगायन, नृत्य आणि पथनाट्य अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करून स्वयंसेवकांनी मुलांचे मनोरंजन केले. बालगृहातील लहानग्यांनीही या सांस्कृतिक सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग घेत आनंद लुटला. केवळ सण साजरा न करता मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी NSS च्या वतीने वह्या, पेन, रंग आणि डिजिटल स्लेट अशा शैक्षणिक साहित्याचे भेट म्हणून वाटप करण्यात आले. तसेच बालगृहाच्या गरजेचा विचार करून ५ ट्यूबलाईट्सचे योगदानही स्वयंसेवकांनी दिले.निरागस मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि स्वयंसेवकांचा सेवाभाव यामुळे हा रक्षाबंधन सोहळा सर्वांच्याच स्मरणात राहणारा ठरला.



# गायत्री स्कूलच्या विद्यार्थिनीचे जवानांसोबत रक्षाबंधन

## विद्यार्थिनींनी बांधली जवानांच्या मनगटावर राखी; देशसेवेच्या भावनेला दिला मानाचा मुजरा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित गायत्री इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, मोशी येथील विद्यार्थिनी रक्षाबंधनाच्या निमित्ताने दिघी आर्मी कॅन्टोन्मेंटला भेट देत भारतीय जवानांसोबत रक्षाबंधनाचा उत्सव उत्साहात साजरा केला.**






यावेळी विद्यार्थ्यांनी देशाच्या संरक्षणासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या जवानांना प्रेमाने राखी बांधून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. जवानांशी संवाद साधत त्यांच्या शौर्य, त्याग आणि देशसेवेबद्दल माहिती जाणून घेतली. तसेच त्यांना सलाम करून राष्ट्रसेवेचा गौरव केला. या भेटीतून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ झाली. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी, आनंददायी आणि अविस्मरणीय ठरला.

या उपक्रमाला गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्सचे अध्यक्ष मा. श्री. विनायकराव भोंगाळे, संचालक श्री. योगेश भोंगाळे, उपसरसेविका मा. सौ. कविताताई भोंगाळे-पाटील, संस्थेचे सचिव मा. श्री. संजय भोंगाळे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली भागवत तसेच संस्थेचे विपणन अधिकारी मा. श्री. शैलेंद्र सिंग यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि भारतीय सैनिकांविषयी आदरभाव निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सैनिकांसोबतचा हा अविस्मरणीय अनुभव आयुष्यभर जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

# ‘इनसाइट २०२६’मधून विद्यार्थ्यांच्या संशोधनाला राष्ट्रीय व्यासपीठ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**येथील एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या कार्यरत असलेल्या सायन्स-टेक क्लब, ॲफ्लेटस क्लब आणि संशोधन व विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ‘इनसाइट २०२६’ या राष्ट्रीय बहुविषयक ऑनलाइन संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला विद्यार्थी व संशोधकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. परिषदेसाठी एकूण २०४ संशोधन लेख प्राप्त झाले असून त्यात ६४० लेखकांनी सहभाग नोंदवला. यामध्ये एमआयटी महाविद्यालयाचे ५०१ तर विविध बाह्य संस्थांमधील १३७ लेखकांचा समावेश आहे.**




प्राप्त झालेल्या सर्व लेखांचे मूल्यमापन आठ बाह्य परीक्षकांमार्फत करण्यात आले. परिषदेत तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. रामकिशन अग्रवाल यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) या विषयावर बीजभाषण केले. त्यांनी उपस्थित विद्यार्थी व संशोधकांना कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील नव्या संधी आणि आव्हानांबाबत सखोल मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांनी सायन्स-टेक क्लब, ॲफ्लेटस क्लब आणि संशोधन व विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राबवलेल्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल विशेष कौतुक केले. संशोधन वृत्तीस चालना देणाऱ्या अशा उपक्रमांना संस्थेचे सातत्याने पाठबळ राहील, असेही त्यांनी नमूद केले. परिषदेचे संयोजक डॉ. सुनील महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. कीर्ती रासकर व श्रीमती शीतल शेवकरी यांनी सहसंयोजक म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली. विद्यार्थ्यांना संशोधन सादरीकरणासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि बहुविषयक ज्ञानाची देवाणघेवाण वाढवणे हा परिषदेचा उद्देश यशस्वी झाल्याचे संयोजकांनी सांगितले.

परिषदेत विविध विषयांवरील संशोधन लेखांचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आणि संशोधकांनी आपल्या संशोधनातील नावीन्यपूर्ण संकल्पना प्रभावीपणे मांडल्या. विविध शाखांतील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे सहभागींच्या ज्ञानात भर पडली. कृत्रिम बुद्धिमत्तेसह आधुनिक तंत्रज्ञानाच्या बदलत्या स्वरूपावरही परिषदेत विशेष चर्चा झाली. संशोधनातील नवे प्रयोग, तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि भविष्यातील संधी यावर विचारमंथन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण होण्यास तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. भविष्यातही अशा बहुविषयक संशोधनपर उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस संस्थेने व्यक्त केला.

DTE Code 6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |



Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**




Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507